अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २९/०७/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २५/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. विनायक वसंत निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुख्यालय, चर्चगेट, मुंबई |
| लाचेची मागणी | दरमहा रू. २,५०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती दरमहा रु. १,७५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे कांदिवली येथील गॅस एजन्सी मध्ये मॅनेजर म्हणून कामकाज पाहतात. तसेच त्यांचे नातेवाईक यांची ठाणे येथे गॅस एजन्सी आहे. तक्रारदार यांचे गॅस एजन्सीवर ऑक्टोबर २०२४ मध्ये लोकसेवक विनायक वसंत निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी कारवाई केली होती. तसेच त्यांचे नातेवाईकाचे ठाणे येथील गॅस एजन्सीवर ऑगस्ट २०२४ मध्ये नमूद विभागाने कारवाई केली होती. त्यानंतर दिनांक १६/०७/२०२५ रोजी लोकसेवक विनायक निकम यांनी तक्रारदार यांना मोबाईलवर संपर्क करून कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक १७/०७/२०२५ रोजी लोकसेवक यांनी विनायक निकम यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांचे गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता महिन्यालया रू. १,५०,०००/- व त्यांचे नातेवाईक यांचे गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता रू. १,००,०००/- असे एकूण दरमहिन्याला रू. २,५०,०००/- लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी ते ऐवढे पैसे देवू शकत नाही काहीतरी मार्ग काढा असे सांगितले असता, लोकसेवक यांनी साहेबांशी बोलून घेतो असे सांगितले. त्यानंतर दिनांक १८/०७/२०२५ रोजी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना संपर्क करून साहेबांशी बोलणे झाले आहे, भेटण्यास या असे सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार अर्ज केला होता.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २५/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक विनायक निकम यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या व त्यांचे नातेवाईक यांच्या कामाकरीता दरमहा रू. २,५०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती त्यांचे गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता रू. १,००,०००/- व त्यांचे नातेवाईक यांच्या गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता रू. ७५,०००/- असे एकूण दरमहा रू. १,७५,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २९/०७/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक विनायक वसंत निकम यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. १,७५,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. मनोज सुतार, सहाय्यक पोलीस आयुक्त** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्रीमती सुनिता दिघे, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in

**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net